# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड,

## मानव्य विद्याशाखे अंतर्गत पीएच.डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी

## सादर करावयाच्या शोधप्रबंधांची रुपरेषा

प्रबंधाचे शीर्षक

"मराठेकालीन यशवंतराव होळकरांचे लष्करी कार्य :- एक चिकित्सक अभ्यास"


संशोधक विद्यार्थी

**महेशकुमार भगवानराव चौरे**

मार्गदर्शक

**प्रा.डॉ. चंद्रकांत बन्सीधर भांगे**

विभाग प्रमुख सैनिकशास्त्र

श्री. शिवाजी महाविद्यालय, परभणी

**प्रस्तावना :- (Introduction)**

भारताच्या भूमीमध्ये मध्ययुगीन कालखंडात अनेक सम्राट, राजे, महाराजे होऊन गेले, ज्यांनी आपल्या कर्तुत्वावर स्वत:चे राज्यनिर्माण केले. मातृभूमीच्या रक्षणासाठी अनेकांनी स्वत:चे बलिदान दिले आहे. यामध्ये प्रामुख्याने आपल्याला 17 व्या शतकामध्ये मराठेशाहीच्या कक्षा विस्तारण्यासाठी माळव्याच्या सुभेदाराची वस्त्रे पेशव्यांकडुन घेवून मराठेशाहीचा झेंडा, अस्तित्व, विस्तार, दबदबा उत्तरेकडे पोहोचविण्यात मल्हारराव होळकर आणि यांच्या घरातील विरांचा सिंहाचा वाटा आहे. उत्तरेकडे मराठेशाहीची मुहूर्तमेढ स्थापित केली. मराठेशाहीची गौरवशाली परंपरा उत्तरेकडे जिवंत ठेवण्याचा प्रयत्न सातत्याने मल्हारराव होळकर यांनी केलेला दिसुन येईल. मराठेशाहीची स्थापना करण्यासाठी ज्यांनी स्वराज्य स्थापित केले होते असे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वप्नातील मराठेशाहीचा या कक्षा उत्तरेकडे विस्तारीत करण्याचा यांचा प्रयत्न होताना आपल्याला दिसुन येतो.

मराठेशाहीच्या माध्यमातुन मल्हारराव होळकर यांनी स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व उत्तरेकडे निर्माण केले. मल्हारावांनी स्वत:च्या राज्याची स्थापना 26 मे 1728 रोजी केली. या राज्याच्या माध्यमातुन अटक् पासुन ते कटक पर्यंतचे कार्य विस्तार मराठेशाहीच्या नेतृत्वाखाली केलेले आहे. मल्हाररावांच्या नंतर होळकरांच्या गादीवर अहिल्यादेवी होळकर या विराजमान झाल्या. त्यांनी होळकरशाहीच्या माध्यमातून अखंड भारतामध्ये आपल्या राज्याचा व मराठेशाहीचा नावलौकिक व्हावा असे कार्य कर्तुत्व केले. अहिल्यादेवीनी त्याग, तपस्या याच्या माध्यमातुन भारतीय इतिहास व संस्कृतीमध्ये अलौकिक कार्य करुन ठेवले आहे. यांनी सबंध भारत देशात हजारो मंदिरे, धर्मशाळा, बारव, पानवटे, पशु-पक्ष्यांसाठी जंगले, पाणी, चारा इत्यादींची व्यवस्था केलेली होती. त्याच बरोबर चारधाम, सातपुरी, बारा ज्योतिर्लिंग, तीर्थस्थानांचा जीर्णोध्दार व नवीन घाट बांधण्याचे कार्य केले आहे. त्यांचा मृत्यू महेश्वर या ठिकाणी 13 ऑगस्ट 1795 रोजी झाला. यांच्या पश्चात होळकरशाहीच्या गादीवर मल्हारराव होळकर यांचे चुलत बंधु तुकोजीराव होळकर विराजमान झाले. तुकोजीराव होळकर यांनी मल्हारराव होळकर यांच्या मार्गदर्शनाखाली सैनिकी शिक्षणाला सुरुवात केली होती. तुकोजीरावांनी सैनिकी मोहिमामध्ये उत्कृष्ट कार्य, पराक्रम, गाजवलेले होते. ज्या प्रकारे अहिल्यादेवींच्या कार्यकाळात राज्यकारभार चालत होता. त्याच पध्दतीने तुकोजीरावांनी पुढे चालु ठेवला. कालांतराने यांचाही मृत्यु पुण्याजवळ 15 ऑगस्ट 1797 रोजी झाला. यांच्यानंतर गादीवर त्यांचे मोठे पुत्र काशीराव होळकर आले परंतु त्यांच्याकडे नेतृत्व करण्याची

आणि राज्यचालवण्याची क्षमता नसल्याने होळकरशाहीच्या राज्याची सुत्रे ही यशवंतराव होळकर यांच्याकडे आली.

यशवंतराव होळकर यांनी आपल्या पूर्वजांचा इतिहास परंपरा रीती रीवाज, शौर्य वाढविण्याचा मानसन्मान ठेवण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याचा वटवृक्ष करण्याचा होळकर परिवारातील वीरांनी रक्त सांडून मराठेशाहीचा झेडा अखंड भारत देशामध्ये फडकवत ठेवला. यशवंतराव होळकर यांचा उगम हा अशा कालखंडामध्ये व परिस्थितीत झालेला दिसुन येतो. की भारतातील अधिकत्तर संस्थानिक, राजे, राजवाडे हे स्वत:च्या राज्याच्या सीमांचे संरक्षण करण्यासाठी आपापसात लढत होते. याच काळात ईस्ट इंडिया कंपनीच्या माध्यमातुन इंग्रज संस्थानिकामध्ये फोडा आणि राज्यकरा या धोरणाचा अवलंब करुन भारतात आपले पाय घट्ट रोवण्याचा प्रयत्न करत होतो. यशवंतराव होळकर यांची दुरदृष्टी म्हणा किंवा नेतृत्व कौशल्य यांना या इंग्रजांच्या धोरणाचा अंदाज लक्षात आल्याने त्यांनी भारतातील संपुर्ण संस्थानिकांना आव्हान केले की इंग्रजांना भारताबाहेर हाकलुन लावण्यासाठी सहकार्य करा, एकत्रित या इथे यशवंतराव होळकर यांची अखंड भारताची संकल्पना दिसून येते. यशवंतराव होळकर यांच्या दृढ ईच्छाशक्ति मुळे इंग्रजांसमोर आव्हान उभे राहिले होते. यशवंतरावांनी मातृभूीच्या पलीकडे जावून आपल्या कर्मभूमीत स्वतंत्र अस्तित्व होळकरशाही व मराठेशाहीची परंपरा कायम ठेवून उत्तर भारतामध्ये आपल्या नेतृत्वाचा ठसा उमटवून दाखविला. अखंड भारतासाठी त्यांनी केलेला प्रयत्न राष्ट्रप्रेम, दुरदृष्टी, युध्दकलेत नैपुण्य असणारा यशवंतराव छ. शिवाजी महाराजांच्या गनिमी कावा पध्दतीचा अवलंब करुन शत्रुला (इंग्रज) सळो की पळो करुन सोडले याप्रमाणे प्रस्तुत मराठेकालीन यशवंतराव होळकरांचे लष्करी कार्य : एक चिकित्सक अभ्यास याविषयाच्या अनुषंगाने सविस्तरपणे अभ्यास करण्यात येणार आहे.

### अभ्यास विषयाचे महत्त्व :-

भारतातील ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीचा विस्तार व वेगवेगळया संस्थानांमध्ये विभागलेल्या भारताचा सत्तेसाठी यशस्वी प्रयत्न ब्रिटीशांनी केला. तत्कालीन इतिहासाचा अभ्यास करत असताना अखंड भारताचे स्वप्न उराशी बाळगुन अतिशय प्रतिकुल परिस्थितीत ब्रिटीशांना शह देण्याचा प्रयत्न लष्करी नितीतुन यशवंतराव होळकरांनी प्रभावीपणे केला. एका धुरंधर सेनापतीचा युद्धइतिहास नविन अभ्यासकांना, विद्यार्थ्यांना व्हावा या भुमिकेतुन तसेच संरक्षण व

सामरिक शास्त्र विषयाचा अभ्यासक म्हणुन अशा दुरदृष्टी व कुशल सेनापतीचा अभ्यास एका लष्करी विचारातुन होणे गरजेचे वाटले.

**संशोधनाचा उद्देश (Objective of the Research):**

प्रस्तुत संशोधनाचा उद्देश पुढीलप्रमाणे आहे.

1. यशवंतराव होळकरांच्या सर्वांगीण कार्य- कर्तृत्वाचा अभ्यास करणे.
2. यशवंतराव होळकर यांच्या अखंड भारत संकल्पनेचा अभ्यास करणे.
3. यशवंतराव होळकर यांच्या युध्दनितीशास्त्राचा अभ्यास करणे.
4. यशवंतराव होळकरांच्या लष्करी व्यवस्थेचा अभ्यास करणे.
5. यशवंतराव होळकरांनी लढलेल्या युध्दातील कार्याचा अभ्यास करणे.
6. इंग्रजांविरुध्द लढलेल्या युध्दातील यशवंतराव होळकरांच्या कार्याचा अभ्यास करणे.

**गृहितके (Hypothess):**

प्रस्तुत संशोधनामध्ये मराठे कालीन यशवंतराव होळकरांचे लष्करी कार्य : एक चिकिस्तक अभ्यास करायचा आहे. त्या अनुषंगाने पुढील गृहितके निर्धारित केली आहेत.

1. इंग्रजाविरुध्द यशवंतराव होळकर यांनी महत्त्वपुर्ण भूमिका बजावली.
2. यशवंतराव होळकर यांनी अखंड भारत निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले.
3. यशवंतराव होळकर यांनी इंग्रजाविरुध्द लढण्यासाठी आधुनिक शस्त्रांचा वापर केला.
4. यशवंतराव होळकर एक कुशल युध्द नेतृत्व उदयास आले.
5. मराठेशाहीतील यशवंतरावांचे महत्त्वपुर्ण योगदान राहिले .

**संशोधन पध्दती : (Research Methodology):**

प्रस्तुत विषयाची गृहितके सिध्द करण्यासाठी संशोधन हे नियोजन बध्द आणि शास्त्रीय पध्दतीने केलेले असुन संशोधनात वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक, सर्वेक्षणात्मक अध्ययन पध्दतीचा उपयोग करण्यात येणार आहे.

**तथ्य संकलन पध्दती : (Methods of data collection):**

संशोधन अध्ययनासाठी विषय क्षेत्राशी संबंधीत साहित्याचे वाचन केले जाईल. संशोधन विषयाच्या विविध पैलुंना स्पर्श करणारे ग्रंथ, ऐतिहासिक संदर्भ ग्रंथ, बखर, दप्तरे, रोजनिशी,

ऐतिहासीक लेख संग्रह, नियतकालिके, वृत्तपत्रे, ऐतिहासिक पत्र व्यवहार इत्यादी सर्व माहिती मिळविण्यासाठी खालील पध्दतीचा वापर करण्यात येईल.

**प्राथमिक स्त्रोत :** ऐतिहासिक पत्रव्यवहार, रोजनिशी

**दुय्यम स्त्रोत :** ऐतिहासिक संदर्भ ग्रंथ, बखर, दप्तर, नियतकालिके, व्यक्तिगत पत्रलेख, चरित्र, इंटरनेट, वेबसाईट, वृत्तपत्रे, मासिके, प्रकाशित शोधप्रबंध अहवाल.

**संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा : (Scope and Limitation):**

प्रस्तुत संशोधनासाठी यशवंतराव होळकर यांच्या जन्मापासुन ते मृत्युपर्यंत च्या कालखंडाचा आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल (1776 ते 1811) त्याच बरोबर उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या आधारावर संशोधन करण्यात येईल. संशोधनाची मुळ उद्दिष्टये व शीर्षक लक्षात घेता यशोचित न्याय देण्यासाठी वरील गृहितके विचारात घेऊन संशोधन पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. केवळ प्रस्तुत संशोधनामध्ये यशवंतराव होळकर यांनी लढलेल्या युध्दाचा अभ्यास केला जाणार आहे. त्याच बरोबर त्यांची रणनिती, शस्त्रप्रणाली, सैन्य संघटन, व्यवस्था इत्यादी.

**1. प्रकरणांची रुपरेषा : (Design of Research):**

या प्रस्तावित संशोधनात पुढील प्रमाणे प्रकरणांची रुपरेषा करण्यात येणार आहे.

**1. प्रकरण पहिले प्रस्तावना :-**

या प्रकरणात विषयाची प्राथमिक ओळख करुन देण्यात येईल. यामध्ये विषयाचे प्रास्ताविक, गृहितके, उद्दिष्टये, संशोधन पध्दती आणि विषयाचे महत्त्व इत्यादीसह “मराठे कालीन यशवंतराव होळकरांचे लष्करी कार्य : एक चिकत्सक अभ्यास” या विषयानुसार अभ्यास करण्यात येणार आहे. मल्हारराव होळकर, अहिल्याबाई होळकर यांच्या राज्य कारभारा संबंधिची माहिती मध्ययुगीन भारतात होळकर सत्तेच महत्त्व इत्यादींचा थोडक्यात आढावा घेण्यात येणार आहे.

**2. प्रकरण दुसरे :- यशवंतराव होळकर यांचे जीवन चरित्र :**

1) जन्मस्थळ 2) कार्य कर्तृत्व 3) मृत्यु

**3. प्रकरण तिसरे :यशवंतराव होळकर यांचे सैन्य संघटन व लष्करी व्यवस्था**

**1. सैन्यदल विभाजन व नियोजन**

1) सैन्य भरती **2**) घोडदळ **3**) तोफखाना **4**) शिस्त **5**) प्रासंगिकता **6**) अनुभव स्थितीतील वर्तन

**2. सैन्यदल विषयक प्रशासक**

1) वेतन व भत्ते यांचे नियोजन 2) पदोन्नती 3) युध्द सन्मान

3. युध्द विषयक शस्त्रास्त्रे :

1) तलवार 2) बाण 3) ढाल 4) बर्चे 5) सुरा 6) बंदुक 7) युध्दविषयक रणनिती 8) युध्दविषयक कला नैपुण्य

4. **प्रकरण चौथे :यशवंतराव होळकर यांचे युध्द विषयक धोरण**

1) 1. युध्द म्हणजे काय 2) युध्दाचे स्वरुप 3) युध्द विषयक भूमिका 4) युध्द जन्य परिस्थीती

2) 1. सैन्य संख्या 2. सैन्य रचना 3. युध्द विषयक प्रत्यक्ष कार्यवाही 4. युध्द विषयक आक्रमण

5. युध्द विषयक योजना (आखणी, बीधणी) 6. युध्दविषयक रणनिती 7. युध्दातील राखीव सैन्यदल व नियोजन 8. युध्दविषयक लष्करी साधन सामग्री व वितरण व्यवस्था

9. सैन्यदल विषयक शिबीरे व गुप्तचर व्यवस्था

10. युध्दातील ध्वाज, पताका, वाद्ययंत्र इत्यादींचा वापर

**प्रकरण पाचवे : यशवंतराच होळकर यांचे तत्कालीन भारतीय राजकारण व सत्ता संबंध**

1. यशवंतरावांची तत्कालीन भारतविषयक ध्येय धोरणे व भूमिका
2. सत्ता स्पर्धा / संघर्ष / यध्दे :-
3. इंग्रजांचा भारतीय सम्राज्यावर वाढता प्रभाव.
4. यशवंतराव होळकरांचा शेवट

**प्रकरण सहावे मुल्यांकन**

"मराठे कालीन यशवंतराव होळकरांचे लष्करी कार्य : एक चिकित्सक अभ्यास" या संशोधनातून सविस्तर अभ्यास करुन मूल्यांकन करण्यात येईल. तसेच प्रस्तुत संशोधनानंतर तथ्यांच्या आधारे काही निष्कर्ष मांडण्यात येतील.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


1. खरे ग.ह. कुलकर्णी अ.रा.(संपा) मराठ्यांचा इतिहास खंड तिसरा, 1761-1846, महाराष्ट्र विद्यापीठ, कॉन्टीनेन्टल, विजय नगर, पुणे -30.
2. वि.का. राजवाडे; इतिहास व इतिहास विषयक लेख खंड-1105
3. पवार जयसिंगराव; मराठी साम्राज्याचा उदय आणि अस्त, अनिल मेहता, अजब पुस्तकालय, भाऊ सिंगजी रोड, कोल्हापुर
4. न.र फाटक; श्रीमन्त महाराज यशवंतराव होळकर, वि.पू. भागवत, मौज प्रिंटिंग व्युरो ख्वाडवाडी मुंबई
5. डॉ. ग्रोवर बिल्ल ; आधुनिक भारताचा इतिहास, एस,चंद्र कंपनी, रामनगर नई दिल्ली 190055
6. संजय सोनवणी; महाराजा यशवंतराव होळकर, भारत बुक हाऊस 1788 सदाशिव पेठ देशमुखवाडी पुणे. 30
7. वा.वा.ठाकुर (संपा) ; होळकर शाहीचा इतिहास भाग 1 ला (इस-1693-1997) होळकर गव्हर्नमेंट प्रेस,इंदूर
8. धनराज होळकर; महाराजा यशवंतराव होळकर, नेशन प्रेस, ओल्ड नं. 38 नवीन नं.-6 मॅकनिकोलस रोड, चेटपेट, चेन्नई-600031
9. श्रीपाद रामचंद्र टिकेकर (संपा); सरदेसाई स्मारक ग्रंथ, केशव भिकाजी ढवळे, श्री समर्थ सदन, बनाम हॉल लेन, गिरगाव मुंबई.
10. डॉ. वि.भा. आठल्ये; आधुनिक भारताचा इतिहास, अंशुल प्रकाशन अमरनाथ अपार्टमेंट, के.डी.के. कॉलेज जवळ नागपुर -09
11. गो.स सरदेसाई; मराठी रियासत खंड-8
12. डॉ. सुमन वैद्य; अखेरचा पेशवा, प्रगती प्रकाशन 87 अ, धंतोली नागपुर-012

13.गो.स.सरदेसाई कृपा कुलकर्णी, यादव माधव काळे, (संपा) ; ऐतिहासकि पत्र व्यवहार, समर्थ भारत छापखाना, 1947 सदाशिव, पुणे-1

14.यशवंतराव नरसिंह केळकर; होळकरांची कैफियत, हनुमान प्रकाशन कार्यालय सदाशिव, पेठ पुणे-02

15.बंडे शारदा गोविंदराव; मराठे कालीन होळकर संस्थान, कल्पना प्रकाशन 6, एच आय.जी. कॉलनी, आय.टी. आय जवळ नांदेड-02

16.प्रा. गणेश रां.मतकार; इंदुरच्या राज्यकर्त्यांचा परिचय, अहिल्या प्रकाशन 135/2 मौती तबेला नं. 1 इंदुर 04

17.गो.स. सरदेसाई; मराठों का नवीन इतिहास खंड-3,(1772-1848), वैभव प्रेस, सर्वन्टस ऑफ इंडीया सोसायटी होम सुन्धराम रोड, गिरगाव, मुंबई नं.-4

18.वासुदेव वामनशास्त्री खरे; यशवंतराव महाकाव्य, ज्ञान प्रकाशन, पुणे.

19.आनंदभाऊ फाळके (संपा) ; शिंदेशाही इतिहासाची साधने भाग-2 य.ता. माणगावकर, दरबार प्रेस, लढकर ग्वाल्हेर 1936

20.शिवराम महादेव परांजपे; मराठ्यांच्या लढ्यांचा इतिहास 1802 ते 1818, रा.रा. शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस, 1026 सदाशिव पेठ पुणे 1934

21.यशवंतराव नरसिंग केळकर; मराठ्यांचा काव्यमय इतिहास भाग-1 गणेश प्रिंटींग वर्क्स, पुणे

22.प्रो. राजाराम विनायक ओरकर; मराठद्वयांचे साम्राज्य, वि.ग. केतकर, अ.वि. ग्रहाचा महाराष्ट्र मुद्रणशाळा, छापखाना 624 सदाशिव पेठ, पुणे शहर

23.नरसिंह चिंतामण केळकर; मराठे और अंग्रज, इतिहास प्रकाशन संस्थन 492 मालवीय नगर, इलाहाबाद .

24.यादव माधव काळे; नागपुर प्रांताचा इतिहास, शंकर रामचंद्र दाते, लोकसंग्रह छापखाना, सदाशिव पेठ, पुणे.

25.वि.का. राजवाडे (संपा) ; मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड -13 व 14, अच्युत चिंतामण भट, यशवंत छापखाना, कसबा पेठ, पुणे शहर 1918

26.मधुसुदामराव होळकर ; होळकरोच्या इतिहास, न्यु ज्ञान प्रेस 495, डी. डी. ए. कॉम्पलेक्स, शहजाक्ष बाग, इन्द्रलाेक दिल्ली. 110035.1992

27. M.S Narvane cder (retd): Battles of the Honourable East India Company S.B. Nagia, A.P.H Publication Corporation Ansari Road, Darya Ganj, New Delhi-11002
28. Randolf G.S. Cooper ; The Ang 10 Maratha Compaign s and the contest for India, The press Syndicate of the university of Cambridge, The pitt building, trumping ton street, Cambridge united kingdom.
29. Mujumdar R.C. pusalkar Ad (ed); The history and Culture of the Indian People Bhartiya Vidya Bhavan, Bombay 1951
30. J.P. Guha; The decisive battles of India 1746-1849, Associated Publication House, New Market Karolbag, New Delhi.
31. Pratul Chandragupta; Bajirao II and The East India Company 1796-1818, Allied Publishers, 15 Graham Road Ballard Estate Bombay, I Asaf Alibroad, New Delhi-I
32. G.S Sardesai; New history of the marathas Vol-11, DB Dhawale forphonix puldication benhan hall sane girgon Bombay-4
33. Fort williom; The Maratha Empire, Printed for drett, pica dillt, Landon- 1804
34. James grant duff; History of the Mahrattas Vol-III, R combruy and co, Law book sellers and Publishers, g hasting street-1918
35. Sir John Malcolm; Memoir of central India vol-I kingsbury Parbury and allen leaden hall street, London 1823.
36. N. Bhat Nagar; The forgotten General Maharata Yashwantrao Holkar I, Shree Sarvottam Prakashan 132, tilak Path, Indore 452007, 2020.
37. Mohan Singh; Waqai Holkar, Sublication Scheme 57, Mishrarayasi Rasta, Juifur 302001 1998.